# कुर्डवाडी अध्यापक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



कुर्डूवाडी (शहर प्रतिनिधी ):कॉलेज ऑफ एज्युकेशन फोर वुमेन कुर्डूवाडी ,अध्यापक विद्यालय कुर्डूवाडी, साई पब्लिक स्कूल कुर्डूवाडी व विवेकानंद विद्यामंदिर कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन डॉ. म. पं .सुरवसे संकुलात उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाप्रसंगी सावित्री बाई यांच्या प्रतिमेला हार घालून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन चे प्राचार्य डॉ.आर.एम सुरवसे होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सीमा शेळके या उपस्थित होत्या . तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून . हर्षल बागल हे उपस्थित होते.आजच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये साई पब्लिक स्कूल व विवेकानंद विद्या मंदिर मधील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित नाटक सादर केले व सावित्रीबाई ज्योतिबा यांची वेशभूषा करून भाषणे केली तर डी. एल. एड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष मधील विद्यार्थिनींनी बालिका दिनानिमित्तबेटीया बेटिया या गीता वर आधारित लघु नाटिका सादर केली. 'होय ,मी सावित्री बोलते' हे एकपात्री नाटक डी.एड..प्रथम वर्षातील विद्यार्थिनी तेजल उबाळे हिने सादर केले.तसेच सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित ओवी ,पोवाडा गीत गायन करण्यात आले. या कार्यक्रमास कॉलेज ऑफ एज्युकेशन फोर वुमेन कुर्डूवाडी व अध्यापक विद्यालय कुर्डूवाडी चे प्राचार्य डॉ. आर.एम सुरवसे ,साई पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक .अतुल नेहरे, आदी उपस्थित होते .

यावेळी डॉ.शीतल तळेकर, डॉ. सुलभा लटके, प्रा. सुदर्शना दुधे , प्रा.राजश्री काळे, प्रा. रेश्मा भोंग, प्रा.नागनाथ बागल, उपमुख्याध्यापक सोनाली बागल, उपमुख्याध्यापक विद्या जाधव, सर्व शिक्षक –शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी , बीएड विद्यार्थिनी, डीएड विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.एड विद्यार्थिनी प्रियांका माने व वैष्णवी कुलकर्णी यांनी केले .प्रियंका पांडगले यांनी आभार मानले.

दैनिक
# दामाजी एक्सप्रेस
वर्ष ११ वे ✦ अंक : १०१ वा ✦ वार : मंगळवार ✦ दि: १२ एप्रिल २०२२ ✦ पाने : ६ ₹५ R.N.I.NO-MAHMAR/2012/41504



# वेताळवाडी संचलित शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाचा निरोप समारंभ

कुर्डूवाडी( शहर प्रतिनिधी) : श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था वेताळवाडी संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशन फोर वुमन कुर्डूवाडी अंतर्गत शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम(उद्व्) चा निरोप समारंभ महाविद्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात श्री तुळजाभवानी च्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रमुख पाहुणे डॉ. हर्षद शहा व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. रवी सुरवसे व प्रशिक्षणार्थी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने शालेय स्तरावर वर्ग नियोजन, शालेय नियोजन ज्याप्रमाणे महत्त्वाचे असते त्याप्रमाणे योग्य जीवन जगण्यासाठी प्रत्येकाने योग्य आर्थिक नियोजन करणे महत्त्वाचे असते. यासंदर्भात प्रमुख पाहुणे हर्षद शहा यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच मंजू उबाळे यांनी रामनवमीनिमित्त गीत गायन केले तर शाहीर नवले यांनी पोवाड्याचे गायन केले.लोंढे, माळी,अनभुले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्राचार्य डॉ. रवी सुरवसे यांनी शिक्षक,मुख्याध्यापकांना पुढील अभ्यासासाठी शुभेच्छा दिल्या.तसेच सतत शिकत राहण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी डॉ. शितल तळेकर,प्रा.एन.जी.बागल,बाळासाहेब राऊत व अजय देशमुख उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुलभा लटके यांनी तर आभार प्रा.सुदर्शना दुधे यांनी केले.

दैनिक
जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर...

# अध्यापक विद्यालयात सावित्रीबाई फुले दिन साजरा



**जनसत्य, प्रतिनिधी**

**कुर्डूवाडी :** कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमेन,अध्यापक विद्यालय कुर्डूवाडी, साई पब्लिक स्कूल कुर्डूवाडी व विवेकानंद विद्यामंदिर कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन डॉ.म.पं.सुरवसे संकुलात उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रथमतः सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस हार घालून, मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेनचे प्राचार्य डॉ.आर.एम.सुरवसे हे होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून,ड. सीमा शेळके या उपस्थित होत्या. जयंती तसेच बालिका दिनाचे औचित्य साधून, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये साई पब्लिक स्कूल, विवेकानंद विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित नाटक सादर केले व सावित्रीबाई तसेच ज्योतिबा फुले यांची वेशभूषा करून भाषणे केली.

डी.एल.एड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष मधील विद्यार्थिनींनी बालिका दिनानिमित्त बेटीया बेटिया या गीतावर आधारित लघु नाटिका सादर केली. होय_मी सावित्री बोलते, हे एकपात्री नाटक डी.एड. प्रथम वर्षातील विद्यार्थिनी तेजल उबाळे हिने सादर केले.

Main Edition
Jan 6, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com
w-app 9850141355

साप्ताहिक

# लोकबोध

RNI NO.:MAHMAR/2022/82606

MARATHI - WEEKLY
LOKBODH
KURDUWADI-SOLAPUR

#Email : lokbodhnews@gmail.com

संपादक : अनिल पंडित ढोबरे मोबा.:९०० ९०४ ११११

# तुळजाभवानी शिक्षण संकुल कुर्डूवाडी मध्ये स्नेहसंमेलनाचे आयोजन



वेताळवाडी / प्रतिनिधी : साई पब्लिक स्कूल ,विवेकानंद विद्यामंदिर ,डी एड व बी एड कॉलेज कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमानाने आज दिनांक 4 मार्च रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.या कार्यक्रमाची सुरुवात श्री. तुळजाभवानी प्रतिमेच्या पूजनाने झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक डॉ. सुरवसे एम.पी होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन माढयाचे माजी आमदार मा.विनायकराव बापू पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार मा. संजय मामा शिंदे हे लाभले.तसेच मा.सौ स्वाती कुंभार (सरपंच -भोसरे) ,मा. गोविंदआबा कुलकर्णी , मा.डॉ जयंत करंदीकर उपस्थित होते.गणेश वंदनाने स्नेहसंमेलनाची सुरुवात झाली.स्नेहसंमेलनामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य, मूकनाट्य ,[illegible]चे प्रकार छोट्याशा चिमुरड्यानी सादर करून उपस्थितांचे व प्रेक्षकांची मने जिंकली."पाणी वाचवा, पाणी जिरवा, महिला सक्षमीकरण ,मोबाईलचा दुरुपयोग" असे संदेश वेगवेगळ्या नृत्यातून व लघु नाटिकेतून सादर करण्यातआले.डी.एडचे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी देखील लावणी, वेगवेगळ्या गाण्यांवरती नृत्य सादर केले.लहान बालकलाकारांची अभिनय क्षमता व नृत्याविष्कार पाहून पालकांनी देखील टाळ्या वाजवून दाद दिली.कार्यक्रमाच्या पाहुण्या सौ .स्वाती कुंभार यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जावे अशा प्रकारचे प्रतिपादन केले . डॉ. जयंत करंदीकर व मा. विनायक बापू पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी रोटरी चे सचिव डॉ. सचिन गोडसे, इनरव्हीलच्या अध्यक्षा सौ. नीना साळुंखे, केंद्रप्रमुख कुंभार मॅडम, मा. सुरेश बागल[illegible].शहा ,डॉ. रजनी सुरवसे व बहुसंख्येने पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन समन्वयक डॉ. शितल तळेकर व प्राचार्य डॉ.रवी सुरवसे यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली साई पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक श्री .अतुल नेहरे विवेकानंद विद्यामंदिर चे मुख्याध्यापक श्री .विजय टोणपे, सौ. विद्या जाधव , सौ.सोनाली बागल, सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुलभा लटके व प्रा. सुदर्शना दुधे यांनी केले .

RNI NO.:MAHMAR/2022/82606

साप्ताहिक

# लोकबोध

#Email : lokbodhnews@gmail.com

संपादक : अनिल पंडित ढोबरे मोबा.:९०० ९०५ ११११

MARATHI - WEEKLY
LOKBODH
KURDUWADI-SOLAPUR

## कॉलेज ऑफ एज्युकेशन फोर वुमेन कुर्डूवाडी, येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी



कुर्डूवाडी/ प्रतिनिधी: साई पब्लिक स्कूल कुर्डूवाडी व विवेकानंद विद्यामंदिर कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन डॉ. म पं सुरवसे संकुलात उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाप्रसंगी सावित्री बाई यांच्या प्रतिमेला हार घालून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन चे प्राचार्य डॉ.आर.एम सुरवसे हे होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सौ.सीमा शेळके या उपस्थित होत्या . तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून श्री. हर्षल बागल हे उपस्थित होते.आजच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये साई पब्लिक स्कूल व विवेकानंद विद्या मंदिर मधील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित नाटक सादर केले व सावित्रीबाई ज्योतिबा यांची वेशभूषा करून भाषणे केली तर डी. एल. एड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष मधील विद्यार्थिनींनी बालिका दिनानिमित्त"बेटीया बेटिया "या गीता वर आधारित लघु नाटिका सादर केली. 'होय ,मी सावित्री बोलते' हे एकपात्री नाटक डी.एड..प्रथम वर्षातील विद्यार्थिनी तेजल उबाळे हिने सादर केले.तसेच सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित ओवी ,पोवाडा गीत गायन करण्यात आले. बी.एडच्या विद्यार्थिनींनी योगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी योगा डान्स सादर केला .या कार्यक्रमास कॉलेज ऑफ एज्युकेशन फोर वुमेन कुर्डूवाडी व अध्यापक विद्यालय कुर्डूवाडी चे प्राचार्य डॉ. आर.एम सुरवसे ,साई पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक श्री .अतुल नेहरे, आदी उपस्थित होते . यावेळी डॉ.शीतल तळेकर, डॉ. सुलभा लटके, प्रा. सुदर्शना दुधे , प्रा.राजश्री काळे, प्रा. रेश्मा भोंग, प्रा.नागनाथ बागल, उपमुख्याध्यापक सोनाली बागल, उपमुख्याध्यापक विद्या जाधव, सर्व शिक्षक -शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी , बीएड विद्यार्थिनी, डीएड विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.एड विद्यार्थिनी प्रियांका माने व वैष्णवी कुलकर्णी यांनी केले .प्रियंका पांडगले यांनी आभार मानले.

दैनिक
# दामाजी एक्सप्रेस
वर्ष १२ वे ◆ अंक : ५६ वा ◆ वार : मंगळवार ◆ दि.७ मार्च २०२३ ◆ पाने : १२ ◆ R.N.I.NO-MAHMAR

# तुळजाभवानी शिक्षण संकुल कुर्डूवाडी मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



कुर्डूवाडी (शहर प्रतिनिधी) : साई पब्लिक स्कूल, विवेकानंद विद्यामंदिर, डी एड व बी एड कॉलेज कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक ४ मार्च रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.या कार्यक्रमाची सुरुवात श्री. तुळजाभवानी प्रतिमेच्या पूजनाने झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक डॉ. सुरवसे एम.पी होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन माढयाचे माजी आमदार विनायकराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संजयमामा शिंदे उपस्थित होते. तसेच भोसरेच्या सरपंच स्वाती कुंभार,कुलकर्णी, डॉ जयंत करंदीकर उपस्थित होते. गणेश वंदनेने स्नेहसंमेलनाची सुरुवात झाली. स्नेहसंमेलनामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य, मूकनाट्य, भयनाट्य, लोककलेचे प्रकार छोट्याशा चिमुरड्यांनी सादर करून उपस्थितांचे व प्रेक्षकांची मने जिंकली. पाणी वाचवा, पाणी जिरवा, महिला सक्षमीकरण, मोबाईलचा दुरुपयोग असे संदेश वेगवेगळ्या नृत्यातून व लघु नाटिकेतून सादर करण्यात आले. डी.एडचे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी देखील लावणी, वेगवेगळ्या गाण्यांवरती नृत्य सादर केले. लहान बालकलाकारांची अभिनय क्षमता व नृत्याविष्कार पाहून पालकांनी देखील टाळ्या वाजवून दाद दिली. कार्यक्रमाच्या पाहुण्या स्वाती कुंभार यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जावे अशा प्रकारचे प्रतिपादन केले. डॉ.जयंत करंदीकर व विनायक पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी रोटरीचे सचिव डॉ.सचिन गोडसे, इनरव्हीलच्या अध्यक्षा नीना साळुंखे, केंद्रप्रमुख कुंभार मॅडम, सुरेश बागल,डॉ. हर्षद शहा,डॉ. रजनी सुरवसे व बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन समन्वयक डॉ.शितल तळेकर व प्राचार्य डॉ.रवी सुरवसे यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली साई पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अतुल नेहरे, विवेकानंद विद्यामंदिर चे मुख्याध्यापक विजय टोणपे, विद्या जाधव, सोनाली बागल, सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुलभा लटके व प्रा.सुदर्शना दुधे यांनी केले.